आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) औरंगाबाद

## School Leadership Academy, Maharashtra

## मोड्यूल क्र.३९

## निपुण भारत अभियानांतर्गत महाराष्ट्रातील ग्रामीण भागात जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये कृतियुक्त अध्यापनातून भाषाविकासात शालेय नेतृत्वाची भूमिका

## Role of School Leadership in Language Development through Creative Teaching in Zilla Parishad Primary Schools in Rural Areas of Maharashtra Under NIPUN BHARAT ABHIYAN

ज्ञानाच्या परिक्षेत्रात जग वेगाने बदलत आहे. संपूर्ण मानवी क्षमता विकसित करण्यासाठी समन्यायी आणि न्याय्य समाजाचा विकास करण्यासाठी आणि राष्ट्रीय विकासाला प्रोत्साहित करण्यासाठी शिक्षण हे अत्यावश्यक आहे. सार्वत्रिक उच्चदर्जाचे शिक्षण हे व्यक्ती, समाज,राष्ट्रआणि जगाच्या कल्याणासाठी, देशाचे समृद्ध बुद्धीवैभव आणि संसाधने यांचा विकास आणि वृद्धी होण्यासाठी सर्वोत्तम मार्गआहे. सन 2015 मध्ये भारताने स्वीकारलेल्या शाश्वत विकासाच्या 2030 च्या कार्य आराखड्यात नमूद करण्यात आलेल्या जागतिक शिक्षण विकासाच्या कार्य आराखड्यानुसार जगात 2030 पर्यंत सर्वांसाठी समावेशक आणि समन्यायी गुणवत्तेचे शिक्षण सुनिश्चित करणे आणि निरंतर शिक्षणाच्या संधींना चालना देणे हे ध्येयआहे. विद्यार्थ्यांना जे शिकवले जात आहे ते तर त्यांना शिकायचेच आहे. त्याचबरोबर त्यांनी सतत शिकत राहण्याची कला देखील अवगत करावी हे अपेक्षित आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार प्राथमिक स्तरावर सन 2026-27 पर्यंत मूलभूत भाषिक व गणितीय कौशल्य प्राप्त करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आलेले आहे. यात प्राथमिक पातळीवरील अनेक विद्यार्थ्यांनी अद्यापपर्यंत मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त केले नाही असे ठळकपणे नमूद आहे. वय वर्ष 3 ते 9 या वयोगटातील सर्व विद्यार्थ्यांना मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त करण्यासाठी त्वरित एक राष्ट्रीयअभियान राबवून त्याची राज्यामध्ये अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. यामध्ये विद्यार्थी, पालक, शाळा, शिक्षक व समाज या सर्वांनी सर्वंकष पुढाकार घेऊन राज्यातील सर्व विद्यार्थ्यांच्या भावी शिक्षणाचा पाया मजबूत करणे गरजेचे आहे.

त्यासाठी भारत सरकारने "समग्रशिक्षा" मध्ये निपुण भारत (National Initiative for Proficiency in Reading with Understanding and Numeracy) अंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याने इयत्ता तिसरी पर्यंत मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान सन 2026-27 पर्यंत प्राप्त करण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे. एवढ्या कमी कालावधी मध्ये हे उद्दिष्ट गाठण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागतील. त्यासाठी योग्य नियोजन व त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी लागेल. विशेषतः पूर्वप्राथमिक व प्राथमिक स्तरावर काम करण्याची खूप आवश्यकता आहे. यासाठी कृती आराखडा तयार करणे गरजेचे आहे. अभ्यासक्रमामध्ये जिज्ञासूपणाला व स्वयंअध्ययनाला वाव देऊन विद्यार्थ्यांना त्या प्रकारचे अनुभव द्यावे लागतील. प्राथमिकस्तरावरील शिक्षणासाठी आकर्षक व संकल्पना स्पष्ट करणारे शैक्षणिक साहित्य तयार करून त्यांचा वर्गात वापर करणे आवश्यक आहे. तसेच मूल्यमापनाची तंत्रे विकसित करून त्याचा उपयोग सातत्याने करावा लागेल. एक महत्त्वाची गोष्ट की इयत्ता चौथी व पाचवी मधील ज्या विद्यार्थ्यांनी मूलभूत कौशल्य प्राप्त केली नाहीत त्यांनाही आवश्यक नैपुण्य प्राप्त करण्यासाठी वैयक्तिक मार्गदर्शन, गटकार्य वयानुरूप पूरक अध्ययनसाहित्य उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

भारत सरकारच्या (National Initiative for Proficiency in Reading with Understanding and Numeracy) निपूण भारत अंतर्गत "मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान" अभियानची अंमलबजावणी करणे बाबत दिनांक 27 ऑक्टोबर 2021 शासन निर्णय निर्गमित झालेला आहे.

दिनांक 22 जून 2015 च्या प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या कार्यक्रमाचे महाराष्ट्रातील शाळांमध्ये नियमितपणे जाणाऱ्या प्रत्येक मुलाने मूलभूत अध्ययन क्षमता प्राप्त करणे व कोणतेही मुल अभ्यासात मागे राहणार नाही हे ध्येय होते. या मोड्यूल मध्ये आपल्याला प्राधान्याने प्रथम भाषा मराठीचा विचार करायचा आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हे शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. विद्यार्थ्यांच्या विकासात प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. त्यामुळे शिक्षण देशातील प्रत्येक मुला-मुलीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न विविध वेगवेगळ्या माध्यमातून करण्यात येतआहे. सर्वांगीण विकास साधायचा असेल तर विद्यार्थ्यांची भाषा खूप महत्वाचे काम करते. विद्यार्थ्यांसाठी मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण असावे. वर्गात काय चालले आहे, शिक्षक व इतर विद्यार्थी काय बोलत आहेत हे जर त्या बालवाडीतील किंवा पहिलीतील विद्यार्थ्याला कळले तरच तो विद्यार्थी अध्ययन अध्यापनाच्या प्रक्रियेत सहभागी होऊ शकेल. शिकण्याची भाषा जर चांगली बोलता येतअसेल, समजतअसेल तर इतर सर्व विषयांचे आकलन लवकर होण्यास मदत होते.

शाळेत येताना मुले आपल्याबरोबर खूप काही गोष्टी घेऊन  येत असतात. जसे भाषा, अनुभव व जगाकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन. खूप वेगवेगळ्या प्रकारचे अनुभव त्यांच्यासोबत असतात. त्यांना खूप बोलायचे असते. आपण त्यांना सतत चूप रहा असे सांगू नये त्यांना बोलू दिले पाहिजे. व्यक्त होऊ दिले पाहिजे. तरच त्यांची भाषा समृद्ध होईल अनुभवांची विचारांची देवाण घेवाण होईल. त्यांच्याजवळ असलेल्या भाषिक संपत्तीचा उपयोग भाषा शिकणे व शिकवणे यासाठी केला गेला पाहिजे. पहिल्या वर्गात येणाऱ्या विद्यार्थ्यांना अनेक शब्द त्यांचे अर्थ त्यांचा उपयोग कुठे करायचा हे माहीत असते. लिपीबद्ध चिन्ह आणि त्याच्याशी संबंधित स्वर/ध्वनी हे विद्यार्थ्यांसाठी अमूर्त स्वरूपात असतात.म्हणून शिकण्याची सुरुवात अर्थपूर्ण साहित्यातून व्हायला हवी. विशिष्ट उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून व्हायला हवी. हळूहळू मुलांना लिपी

माहीत झाली की त्यातून त्यांच्यात आपल्या आजूबाजूच्या परिसरात असलेल्या लिखित भाषा समजण्यासाठी कुतुहले निर्माण होते. एकदा वाचता आले कते स्वतः वाचन करून ज्ञाननिर्मिती करतअसतात. या ज्ञानाची निर्मिती कोणाच्या दबावातून व दडपणातून होत नसून मुलांच्या स्वतःच्या अनुभवातून वआवश्यकते नुसार होतअसते. त्यासाठी मुलांना असे वातावरण मिळणे गरजेचे आहे.

राज्यातील 100% मुलं प्रगत होण्यासाठी त्यांचा शिकण्याचा पाया भक्कम हवा. औपचारिक शिक्षणात याची सुरुवात मूलभूत वाचनाने होते. मुलांनी आनंदाने शिकायला हवे. असे झाले तरच पुढील वर्गाच्या अध्ययननिष्पत्ती साध्य होतील आणि गुणवत्ता विकासाचे उद्दिष्ट पूर्तीकडे आपण वाटचाल करू शकणार.भाषा व गणित विषयाच्या अध्ययन समृद्धी कार्यक्रमांतर्गत इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंत चे वर्ग असणाऱ्या शाळांना दोन्ही विषयांचे अध्ययन साहित्य संच व पुस्तिका पुरविण्यात आल्या इयत्ता पहिली ते पाचवीतील वेगवेगळ्या अध्ययनस्तरातील विद्यार्थ्यांसाठी हा संच उपयुक्तआहे या संचात मराठी विषयाचे शैक्षणिक साहित्यचे 59 प्रकार आहेत ही कार्ड्स कोणती आहेत कशासाठी आहेत त्यांच्या साह्याने वर्गात कोणत्या कृती घेता येतील कशा घेता येतील यातून मुलांचे शिकणे कसे होईल याची माहिती शिक्षकांना होण्यासाठी एक अध्ययनसमृद्धी पुस्तिका सुद्धासोबत देण्यात आलेली आहे यामुळे प्राथमिक स्तरावरच अनेक अमूर्त संकल्पना स्पष्ट होतात व विद्यार्थ्यांची भाषा समृद्ध होईल फक्त शिक्षकांनी काटेकोर अंमलबजावणी केली पाहिजे व आशय व विद्यार्थी यांच्या मधील उत्तम दुवा होण्याचे कौशल्य विकसित केले पाहिजे.

अध्ययन अध्यापन संसाधनांच्या तरतुदीकरून, साहित्यपुरवून, शिक्षकांचे उदबोधन करून, प्रशिक्षण देऊन आणि शिक्षण प्रक्रियेवर नियमित देखरेख करून सुद्धा आवश्यक गतीने मुलांचा शैक्षणिक स्तर योग्य पातळी गाठत नाही असे दिसले. कोणत्या आशयातून किंवा विषयातून कोणत्या अध्ययननिष्पत्ती पूर्ण करायच्या आहेत त्याबाबत स्पष्टता असावयास पाहिजे असे लक्षात आले. विषयनिहाय त्या त्या अध्ययनक्षमते चा विकास करण्यासाठी अध्ययननिष्पत्ती नमूद करून विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमता तपासणे व त्याप्रमाणे शिक्षणाचा दर्जा सुधारणे आवश्यक आहे.

## मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्टे

- निपुण भारतअभियानाअंतर्गत भाषा विकास ही संकल्पना समजून घेणे.
- विद्यार्थ्यांमध्ये भाषिक कौशल्य यशस्वीपणे विकसित करणाऱ्या मुख्याध्यापक विषयसाधनव्यक्ती यांच्या कार्यपद्धतींचा अभ्यास करणे.
- प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा भाषाविकास साधण्यासाठी विविध कृतीयुक्त उपक्रमांच्या अंमलबजावणीचा अभ्यास करणे.

## संबंधित विषयाच्या संकल्पना

निपुण भारत अभियान, कृतीयुक्त अध्यापन, भाषिक कौशल्ये, पायाभूत साक्षरतेचे घटक, मुलभूत साक्षरता व संख्याज्ञान,  गृह अध्यापन व स्वयंशिक्षण

## निपुण भारत अभियान

राज्यात सन 2026- 27 पर्यंत इयत्ता तिसरी पर्यंतच्या 100% विद्यार्थ्यांना मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त करण्यासाठी तसेच इयत्ता तिसरी पुढे गेलेल्या तथापि अपेक्षित क्षमता प्राप्त न करू शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी निपुण भारत अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाची अंमलबजावणी करण्यास शासनमान्यता देत असून पुढील प्रमाणे दिशा निर्देश करत आहे. 3 ते 9 वर्ष वयोगटातील विद्यार्थ्यांचा प्रारंभिक भाषाविकास होण्यासाठी मातृभाषेमध्ये मौखिक भाषाज्ञान, समजपूर्वक ऐकणे, त्याचे आकलन,मुद्रण शास्त्र व उच्चारशास्त्र यांच्या विकासाची जाणीव व लेखन कौशल्याचा विकास होणे गरजेचे आहे. भाषिक कौशल्यप्राप्त होण्यासाठी भाषेचे पूर्वज्ञान मदतगार ठरेल. ज्या विद्यार्थ्यांचा मातृभाषेचा पाया मजबूत असतो ते विद्यार्थी इंग्रजी व अन्यभाषाअधिक सहजतेने शिकू शकतात.

## पायाभूत साक्षरतेचे घटक :-

१. मौखिक भाषाविकास लेखन व वाचनाची कौशल्यविकसित करण्यासाठी मौखिक भाषेचा विकास महत्त्वाचा आहे.
२. चार शास्त्राची जाणीव शब्दांची लय व ध्वनीची जाणीव याबाबींचा योग्य वापर होणे गरजेचे आहे.
३. सांकेतिक भाषा लिपी समजून घेणे यामध्ये छापील मजकुरांचे आकलनकरण्याची क्षमता, अक्षरांचे ज्ञान, सांकेतिक भाषा,लिपी समजून घेणे, शब्द ओळखणे.
४. शब्दसंग्रह मौखिक शब्द संग्रह वाचन लेखन शब्द संग्रह व शब्दांच्या विविध अर्थछटा
५. वाचन वआकलन मजकुरांचे वाचन करून अर्थ समजून घेणे माहिती प्राप्त करणे व मजकुराचे स्पष्टीकरण करणे.
६. वाचनातील ओघवतेपणा मजकूर अचूकपणे व लयबद्ध वाचणे अभिव्यक्ती व आकलन
७. लेखन अक्षरे व शब्द लिहिणे अभिव्यक्तीसाठी लिहिणे याची क्षमता
८. आकलन छापील/मजकूर पुस्तके यामुळे आकलत कौशल्य विकसित होण्यास मदत.
९. वाचन संस्कृती वाचनाकडे कल यामध्ये विविधतेची पुस्तके व इतर वाचन साहित्य वाचण्याकडे कल असणे.

## शालेय नेतृत्वासमोरील आव्हाने :-

## शिक्षक,पालक,समाज,विद्यार्थी

- **शिक्षकस्तरावरील आव्हाने** :-

भारतसरकारच्या (National Initiative for Proficiency in Reading with Understanding and Numeracy) निपुण भारत अंतर्गत मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञानाची अंमलबजावणी करून प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांना मूलभूत भाषिक व गणितीय कौशल्य प्राप्त करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. यात वय वर्ष 3 ते 9 या गटातील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. म्हणून यात आता पूर्व प्राथमिक मधील विद्यार्थ्यांचा विचार करणारआहोत.

अंगणवाडी किंवा बालवाडीमध्ये विद्यार्थ्यांचा सामाजिक विकास व्हावा व सोबत भाषिक कौशल्य विकसित व्हावी असे अपेक्षित आहे. परंतु प्रत्यक्ष पाहिले असता गावांमध्ये अंगणवाडी ताईंना अनेक

प्रकारची कामं करायची असतात. त्यांच्या या कामांच्या जबाबदारीमुळे विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. वय वर्ष 3 ते 6 च्या विद्यार्थ्यांना अध्ययन अनुभव देणे, शिकवणे तसे कठीणच असते. पहिल्यांदाच घराच्याबाहेर आईला सोडून ते मूल शाळेत आलेले असते. त्या मुळे ते फार गोंधळलेले असते. हा गोंधळ कमी करून त्यांच्या मध्ये भाषिक कौशल्य विकसित करणे हे अंगणवाडी ताई समोर एक प्रकारचे आव्हान आहे.

प्राथमिक स्तरावर जेव्हा वर्गात 50 ते 60 विद्यार्थ्यांचा पट असतो तेव्हा प्रत्येक विद्यार्थ्याकडे लक्ष पुरवणे. त्यांच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांना वैयक्तिक मार्गदर्शन करणे फार कठीण आहे. ही आव्हानात्मक काम शिक्षकांना करावी लागतात. या वयात मुलांचे अवधान एका गोष्टीवर सतत फार वेळ टिकत नाही. वेगवेगळ्या कृती त्यांना करायच्या असतात. वेगवेगळे साहित्य त्यांना हाताळायचे असतात. त्यांची ही आवड लक्षात घेऊन पालकांच्या मदतीने या आव्हानांवर काही प्रमाणात शिक्षक मात करू शकतात. वर्गामध्ये अनेक वेगवेगळ्या घरांमधून, वातावरणातून, परिसरातून विद्यार्थी येत असतात. त्यांची आकलन क्षमता वेगवेगळी असते. आवडी, निवडी, इंटरेस्टचे विषय वेगवेगळे असतात. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन या वयोगटातील वय वर्ष 3 ते 9 च्या विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत साक्षरता विकसित करणे एक कौशल्य आहे.

## पालकस्तरावरील आव्हाने:-

जेव्हा घरात बाळ जन्माला येते व ते मोठे होऊ लागते तेव्हा घरातील व्यक्तींवर एक वेगळी व महत्त्वाची जबाबदारी असते. त्यातल्या त्यात विभक्त कुटुंबामध्ये आई- वडील दोघे ही नोकरी निमित्त किंवा कामानिमित्त बाहेर जात असतील तर या मुलांची जबाबदारी आजी-आजोबा किंवा पाळणाघर किंवा मुलं सांभाळणाऱ्या ताईंवर असते.या मुलांचा शारीरिक,मानसिक,भावनिक विकास होत असतो. यावेळी मुलांचे प्रश्न सोडवण्यात पालक कमी पडले तर नक्कीच त्याचा परिणाम मुलांवर होतो. त्यांच्या भावी जीवनावर होतो.बरेचदा आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे मुलाला जन्म दिला की आईला काही दिवसानंतर कामाला जावे लागते. त्यामुळे बाळाच्या पोषणाकडे व मानसिक गरजेकडे दुर्लक्ष होऊ शकते.बाळाचे पोट भरले की झाले असा बहुतेक पालकांचा समज असतो. पण या वयामध्ये मुलांना शारीरिक पोषणासोबतच मानसिकआधार,प्रेम,सुरक्षितता,कौतुक,ॲप्रिसिएशन या सर्वांचीच गरज असते.या गोष्टी पालकांच्या लक्षात येत नाही.त्यामुळे ही मुलं मागे राहतात.या सर्व गोष्टी लक्षात घेऊन बाळावर योग्य संस्कार करणे पालकांसमोर एक आव्हानआहे. कधीकधी शाळा घरापासून लांब असतात मुलांना शाळेत ने आण करायची व्यवस्था नसते.त्यावेळी काय करावे हे पालकांसमोर मोठे आव्हान असते.आजकालच्या सवयीनुसार नुसार तीन वर्षाच्या मुलाला कॉन्व्हेंट मध्ये टाकले जाते.या शाळेत गेल्यानंतर त्या ठिकाणी असलेले वातावरण, इंग्लिशमधून बोलणारे शिक्षक यामुळे मूल गोंधळून जाते.त्याला तिथे काहीही समजत नाही.बोलता येत नाही.घरचे वातावरण वेगळेअसते.पण पालक मुलांच्या अडचणी सोडवू शकत नाही. हे पण पालकांसाठी एक मोठे आव्हान आहे.

## समाजस्तरावरील आव्हाने:-

समाजामध्येअनेक अनिष्ट रूढी परंपरा दीर्घकाळापासून चालत आलेल्या आहेत.या रूढींचा पगडा समाजमनावर बसलेला आहे.अजूनही काही समाजात, काही प्रदेशांमध्ये बालविवाहसारख्या प्रथा अस्तित्वात आहेत.मुलींचा जन्म म्हणजे कुटुंबावरओझेअसते....अशा मानसिकतेमध्ये जगणारे लोक अजूनही दिसून येतात .त्यामुळे मुलींना शाळेत घालणे, तिचे चांगले भरणपोषण करणे,तिच्या शारीरिक,मानसिक,भावनिक विकासास महत्त्व देणे या गोष्टी काही लोक नाकारतात.त्यामुळे समाजातील

मुली शाळेपासून शिक्षणापासून वंचित राहतात.समाजाचा मुलींकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे हे एक प्रकारचे आव्हान आहे.

आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक स्थलांतर करणारे पालक यांनाही स्वतःच्या मुलांच्या शिक्षणाचे फारसे महत्त्व वाटत नाही. पालक कामाच्या अनुषंगाने सतत स्थलांतर करत असतात.त्यामुळे एका गावात ते स्थिर राहत नाही.पर्यायी मुलांना शाळेत घालत नाहीत. शाळेत नाव टाकले तरीही मुलं अनुपस्थित असतात. त्यामुळे शिक्षणापासून वंचित राहतात.अशा मुलांसाठी असलेल्या शासनाच्या योजना त्यांना माहीत नसतात.माहिती असल्या तरी बरेचदा या योजनांचा लाभ ते घेत नाहीत. मुलांच्या शिक्षणापेक्षा त्यांची सुरक्षितता व त्यांचेसोबत असणे हे या लोकांना महत्त्वाचे वाटते.त्यामुळे समाजातील खूप मुलं शाळेपासून शिक्षणापासून वंचित राहतात. रस्त्यांवरून फिरणारी मुलं,रेल्वेमध्ये भीक मागणारी मुलं,चौका चौकात बारीक-सारीक वस्तू विकणारी मुलं,वीट-भट्टी, शेती कारखाने या ठिकाणी कमी मोबदल्यात काम करणारी मुलंही मुले खूप मोठ्या संख्येने समाजात आहेत.या मुलांना शाळेत आणून त्यांना मूल्यवर्धक व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे हे समाजासाठी फार मोठे आव्हान आहे.

## विद्यार्थी स्तरावरील आव्हाने:-

व्यक्ती तितक्या प्रकृती या उक्ती प्रमाणे प्रत्येक मूल वेगळं असतं. त्याच्या आवडी निवडी, छंद, आकलन क्षमता, स्वभाव, घरातील वातावरण, आर्थिक परिस्थिती, मिळणारे पोषण या सर्व घटकांचा बालकाच्या वाढ व विकासावर परिणाम होत असतो. वर्गात एका वेळी एका तासिकेत शिक्षकाने शिकवलेले सर्व विद्यार्थ्यांना सारखेच समजेल असे नसते. प्रत्येक विद्यार्थ्यांचा विचार केला तर काही मुलांना ते चांगले समजलेले असते, काहींना थोडे फार समजलेले असते, तर काही 5-2 मुलं असेही असतात की वर्गात काय चालले आहे हे समजायला त्यांना थोडा वेळ लागतो. आपापल्या गतीने ते शिकत असतात.त्यांची व शिक्षकांची गती वेगवेगळी असल्यामुळे काही दिवसांनी ही मुलं माग पडतात. सोबतच घरात बोलली जाणारी भाषा व शाळेतील भाषा यामध्ये फरक असतो. त्यामुळे शाळेतील संवादात काही मुलं भाग घेऊ शकत नाही व कालांतराने मागे पडतात.काही मुलं लाजरी असतात, कमी बोलणारी असतात, काहींच्या मनात न्यूनगंड असतो त्यामुळे ही मुलं फक्त शरीराने शाळेत उपस्थित असतात.पणअध्ययन अध्यापन प्रक्रियेत प्रत्यक्ष सहभागी होत नाहीत. ही मुलं मागे पडतात. काही मुलं शाळेतच येत नाहीत.त्यांना शाळेतील बंदिस्त वातावरण नकोअसते.बाहेरचा खुला निसर्ग त्यांना खुणावतअसतो.त्यामुळेअभ्यासापासून ते दूर जातात.काही मुलांचे पालक त्यांच्याबाबत उदासीन असतात. अशा अनेक कारणांमुळे मुलं अभ्यासात मागे राहतात आणि त्यांना वाचन, लेखन, संवाद, गणितीय क्रिया,संख्याज्ञान या बाबींचे आकलन लवकर होत नाही. मुलांच्या शिकण्यातील हे सर्व अडथळे आहेत,आव्हानं आहेत.आपणअभ्यासात इतर मुलांच्या मानाने मागे आहोत आपल्याला काहीच येत नाही असे त्यांना वाटते.आत्मविश्वास कमी होतो व हळूहळू ही मुलं शाळेपासून अथवा शिक्षणापासून दूर होत जातात.या सर्व आव्हानांवर मात करण्यासाठी शिक्षकाने त्यांच्या वर्ग पातळीवर या प्रकारच्या मुलांकडे विशेष लक्ष देऊन प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**यशोगाथा 1:-**






**शब्दावरून गोष्ट तयार करतांना विद्यार्थी**

शिक्षण क्षेत्रामध्ये काम करताना अनेक अडचणी येतात समस्या येतात या अडचणींचा बाऊ न करता त्यावर मात करून उद्दिष्ट प्रतल करणे महत्त्वाचे आहे गाव खेड्यांमध्ये जिल्हा परिषदेच्या शाळा सुरू आहेत त्या गावचे एकच आकर्षण असते ती म्हणजे शाळा शाळेकडून गावकऱ्यांना खूप अपेक्षा असतात गाव सुधारण्याचे भेज शाळेत दडलेले असते या शाळेत कार्यरत असलेले मुख्याध्यापक व शिक्षक यांची भूमिका खूप महत्त्वाची असते.

निपुण भारत अभियाना अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान सन 202-27 पर्यंत प्राप्त करण्याचे लक्ष निर्धारित केलेले आहे यामध्ये वय वर्ष तीन ते नऊ चा वयोगट निश्चित करण्यात आलेला आहे एवढ्या कमी वेळात ठराविक उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी प्रत्येकाला युद्ध पातळीवर प्रयत्न करावे लागतील काही मुख्याध्यापक व शिक्षकांनी कामाची सुरुवात केलेली आहे **जिल्हा परिषद उच्च प्राथमिक केंद्रशाळा अजंती पंचायत समिती हिंगणघाट मध्ये प्रतिभा धनराज नामोते या मुख्याध्यापिका** यांनी स्वतः परिश्रम घेऊन विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास करण्यासाठी पाऊल उचलले आहे. शाळा दुर्गम भागात असल्यामुळे दुर्लक्षित आहे शाळेच्या आजूबाजूचा परिसर आतील परिसर वर्ग खोल्या मुलांची स्वच्छता पालक संपर्क समाज सहभाग गुणवत्ता विकास या सर्व बाबींवर काम करण्याची गरज होती शाळेतील सर्व शिक्षकांना सोबत घेऊन वरील बाबींवर चिंतन म्हणून करण्यात आले समस्या व अडचणी लक्षात घेण्यात आल्या त्या कशा सोडवायच्या यावर विचार मंथन झाले सर्वांना जबाबदाऱ्या वाटून देण्यात आल्या मुख्याध्यापिकेसह सर्व शिक्षकांनी मन लावून काम केले अंगणवाडी ताईंना सोबत घेतले व मुलांच्या गुणवत्ता विकासाच्या दृष्टीने नियोजन केले विद्यार्थ्यांना गरजेनुरूप अध्ययन अनुभव देण्यात आले त्यांच्या शैक्षणिक अडचणी सोडवण्यात आल्या शाळेमध्ये आनंददायी वातावरण असल्यामुळे मुले शाळेत येऊ लागली शिकू लागली सर्वांना शाळा हवीहवीशी वाटू लागली त्यानंतर अप्रगत विद्यार्थी विहीन शाळा स्पर्धा असा उपक्रम शासनाकडून घेण्यात आला त्या उपक्रमात ही शाळा सहभागी झाली मुख्याध्यापकांनी व सर्व शिक्षकांनी शाळेच्या भौतिक सुविधा व गुणवत्ता विकास यावर काम करायला सुरुवात केली सर्वांच्या सहकार्याने व मुख्याध्यापकांच्या विशेष भूमिकेमुळे अप्रगत विद्यार्थी विहीन शाळा या स्पर्धेत हिंगणघाट तालुक्यातून या शाळेला दुसरा क्रमांक प्राप्त झाला व शाळेला दोन लाख रुपयांचे बक्षीस मिळाले निपुण अभियान अंतर्गत या शाळेत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यावर काम सुरू आहे विद्यार्थ्यांनी गुणवत्ता सुधारण्यास शिक्षकांना यश मिळत आहे अंगणवाडी ताई व अंगणवाडीचे विद्यार्थी पण यात सहभागी आहेत या कार्याची फलनिष्पत्ती म्हणजे शाळा भौतिक दृष्ट्या सुसज्ज झाली गुणवत्ता विकासाचे काम सातत्याने सुरू आहे शाळेचा परिसर फुले झाडांनी भरला आहे गावकरी शाळेशी जोडल्या गेले आहेत खेळातून मुलांचा शारीरिक विकास झाला आहे अशा शाळेकडून नक्कीच इतरांनी प्रेरणा घेणे अपेक्षित आहे.

**यशोगाथा 2:-**






**वाचन विकास कार्यक्रमात सहभागी विद्यार्थी**

**नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर पंचायत समिती मधील ब्राह्मणी केंद्र व या केंद्रातील एक छोटेसे गाव बेलोरा येथे श्री मोहन रामचंद्र डंबारे हे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत** आज-काल सर्वच पालकांना स्वतःचे मुल इंग्रजी माध्यमाच्या शाळेत टाकावे असे वाटते परंतु या शाळेत मुख्याध्यापक व शिक्षकांनी मिळून असे वातावरण तयार केले आहे की पालक स्वतःहून स्वतःच्या मुलाचे नाव या शाळेत आनंदाने घालतात येथे मिळणाऱ्या शिक्षणाने पालक व गावकरी समाधानी आहेत भरमसाठ पैसे देऊन एखाद्या कॉन्वेंटमध्ये मिळणार नाही एवढे दर्जेदार शिक्षण जिल्हा परिषदेच्या या बेलोरी गावामध्ये मिळत आहे. श्री डंभारे सर व त्यांच्यासोबत सहाय्यक शिक्षक म्हणून काम करणाऱ्या सौ विजया कोकमवार मॅडम यांनी शाळेत विद्यार्थ्यांना आनंददायी व दर्जेदार शिक्षण मिळण्याकरता साठी खूप परिश्रम घेतले आहेत. सर्वप्रथम त्यांनी भाषिक कौशल्याकडे लक्ष दिले. मुलांचे श्रवण, भाषण, वाचन, लेखन विकसित करण्यासाठी उपक्रमांचे नियोजन केले. यामध्ये सर्वात महत्त्वाची पायरी आहे वाचन. वाचन हे समज पूर्वक असावे. मुलं समजपूर्वक वाचन करतात काय? वाचनामध्ये त्यांना कोणत्या अडचणी आहेत याबाबत प्रत्येक विद्यार्थ्यांच्या नोंदी ठेवून त्याप्रमाणे त्यांना अध्ययन अनुभव दिले. मुलांना समज पूर्वक वाचन यावे, लेखन करता यावे, तसेच संख्याज्ञान व गणिताच्या मूलभूत प्रक्रिया बेरीज, वजाबाकी, भागाकार, गुणाकार अचूक करता येण्यासाठी आगळे वेगळे मुलांना समजेल असे अध्ययन अनुभव विद्यार्थ्यांना देण्यात आले. शैक्षणिक साहित्यातून संकल्पना स्पष्ट करणे व वैयक्तिक मार्गदर्शन करणे असे वेगवेगळे उपक्रम वर्गात आयोजित करून गुणवत्ता विकास साधला आहे.




वरील दोन्ही यशोगाथा शाळेतील मुख्याध्यापकांच्या विशेष प्रयत्नांमुळे निर्माण झालेल्या आहेत मुख्याध्यापकाची भूमिका खूप महत्त्वाची असते त्यांनी ठरवलं तर ते शाळेतील शिक्षकांना समाजामध्ये गावकऱ्यांना योग्य दिशा दाखवून उद्दिष्टाप्रत नेण्यासाठी प्रवृत्त करू शकतात.

https://youtu.be/P3FWOV7zRmw
https://youtu.be/RO-lw5gE8vc
https://youtu.be/uREhYTTLTOk
https://youtu.be/ZobHhFjJ17U

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP 2020) :-

शिक्षण क्षेत्रातील गुणात्मक सुधारणा आणि शिक्षणाला चार भिंतीबाहेर नेऊन मुलांचा सर्वांगीण विकास करण्याच्या उद्देशाने नवीन शैक्षणिक धोरण 2020 मध्ये लागू करण्यात आले आहे, या नवीन शैक्षणिक धोरणामध्ये 5+3+3+4 पद्धतीवर शैक्षणिक रचना असून 5+3+3+4 म्हणजे 5 वर्षे मुलभूत शिक्षण (तीन वर्षे पूर्व प्राथमिक शिक्षण आणि इयत्ता पहिली आणि दुसरी ) 3 वर्षे तयारी स्तर (वर्ग 3 ते 5) 3 वर्ष मध्यम (किंवा उच्च प्राथमिक) स्तर (इयत्ता 6 ते 8) 4 वर्षे उच्च (माध्यमिक) स्तर (वर्ग 9 ते 12) याप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे. इयत्ता पाचवी पर्यंतच्या शिक्षणात मातृभाषा / स्थानिक किंवा प्रादेशिक भाषा हे अभ्यासाचे माध्यम म्हणून स्वीकारण्यावर भर देण्यात आला आहे. या सोबतच माहिती तंत्रज्ञानाव्दारे मुलांना डिजिटल शिक्षणही दिले जाणार आहे, त्यासाठी शाळांमधील पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी निधीचीही तरतूद आहे. मुलांनी सुद्रुढ राहण्याबरोबरच शिक्षितही राहावे यासाठी शाळांमधील सर्व स्तरांवरील विद्यार्थ्यांना बागकाम, नियमित खेळ, योग, नृत्य, कला, यांचे ज्ञान देण्याचा प्रयत्न केला जाईल. शाळांमधील (अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्र) शिकणे हे सर्वांगीण, एकात्मिक, आनंददायी आणि रंजक असले पाहिजे. अत्यंत समग्र आणि सर्वसमावेषक असा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा तयार केला आहे. राष्ट्रीय एकात्मता राखण्यासाठी काही बाबी समान ठेवून स्थानिक गरजेनुसार या आराखड्यात बदल करण्याचे अधिकार राज्यांना दिले आहेत. २१ व्या शतकातला नागरिक बनवण्याची ताकत असलेली रचनात्मक शैक्षणिक पद्धती स्वीकारली आहे. शिक्षण केवळ पुस्तकी न राहता वर्गाबाहेरील घडामोडींचा समावेश कसा होईल, विद्यार्थ्यांच्या भविष्यातील जीवनात ते प्रत्यक्ष उपयोगी कसे पडेल, विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व घडवले जाईल याद्दष्टीने त्याचे अनुभव विश्व कसे समृद्ध करता येईल या सर्वाचा विचार त्यात केला आहे.

- शिक्षण पद्धती तील घोकंपट्टी ऐवजी खरे आकलन आणि शिकायचे कसे हे शिकणे याकडे नेणारा असावा.
- एकविसाव्या शतकातील मुख्य कौशल्ययुक्त संपूर्ण व सर्वांगीण विकसित व्यक्तीची निर्मिती होणारा असावा.
- पूर्व प्राथमिक ते उच्च शिक्षण स्तरापर्यंत अध्ययनाच्या प्रत्येक टप्प्यावर सर्व क्षेत्रातील विशिष्ट कौशल्य समूह आणि मूल्य यांचे एकात्मिकरण आणि समावेशनासाठी निश्चिती केली जाईल
- अध्ययन अध्यापनाच्या रंजक प्रक्रियेतून कौशल्य आणि मूल्य रुजवली जाईल.
- चिकित्सक विचार आणि अधिक समग्र पृच्छा, शोध, चर्चा व विश्लेषण यावर आधारित अध्ययन यांना वाव मिळण्यासाठी अभ्यासक्रमाचा आशय व प्रत्येक विषयातील गाभा अशा आशया पुरता मर्यादित केला जाईल, हा आशय महत्त्वाच्या संकल्पना विचार, उपयोजन आणि समस्या निराकरण यावर केंद्रित असेल.

- सर्व स्तरावर अनुभवात्मक अध्ययनासाठी प्रत्येक विषयातील प्रमाणभूत अध्यापन शास्त्रीय पध्दत म्हणून स्वतः कृतीतून  शिकणे, कला आणि क्रीडा एकात्मिक शिक्षण, कथाकथन आधारित अध्यापन शास्त्रीय पद्धत, तसेच विविध विषयांचा सहसंबंध शोधण्याचा समावेश असेल.
- वर्गातील सत्र हे विद्यार्थ्यांच्या सखोल आणि अधिक अनुभवात्मक अध्ययनासाठी अधिक रंजक आणि सर्जनशील, सहयोगी आणि शोध पूर्ण कृती उपक्रमांचा समावेश असलेले असतील.
- मूल्यमापनाची साधने वर्गाच्या प्रत्येक विषयाच्या अध्ययन निष्पत्ती आधारित क्षमता आणि रचना यांच्याशी संलग्न केल्या जातील.

**संदर्भ साहित्य -**


1. National Education Policy 2020
2. अध्ययन निष्पत्ती प्राथमिकस्तर, इयत्ता पहिली ते पाचवी, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, पुणे.
3. मराठी व गणित अध्ययन समृद्धी कार्यक्रम,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
4. सन २०२२-२३ या कालावधीसाठी विभागास दिलेली KRA उद्दिष्ट्ये, शासन परिपत्रक दिनांक २३ मे २०२२
5. National Initiative for Proficiency in Reading  with Understanding and Numeracy निपुण भारत अंतर्गत मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञानाची अंमलबजावणी करणे बाबत शासन निर्णय दिनांक २७ ऑक्टोबर २०२१
6. प्रथम भाषा मराठी,इयत्ता पहिली ते तिसरी, पाठ्यपुस्तक,महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, पुणे.
7. अध्यापन शास्त्रीय नेतृत्व, गुणवत्तापूर्ण शालेय शिक्षणासाठी,महाराष्ट्र नियोजन व प्रशासन संस्था, औरंगाबाद.
8. जीवन शिक्षण,जून-जुलै 2016,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र.
9. जीवन शिक्षण,जानेवारी  2022,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र.
10. शिक्षणाच्या वाटा,मार्च 2020,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र



**मोड्यूल विकसक**
डॉ.सीमा पुसदकर
अधिव्याख्याता
प्रादेशिक विद्या प्राधिकरण
राज्य विज्ञान शिक्षण संस्था नागपूर

**समन्वयन**
डॉ.ज्योती कुलकर्णी
समन्वयक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद

**मार्गदर्शक**
श्री.रमाकांत काठमोरे
संचालक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद